**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स छत्रपती संभाजीराजे साखर उद्योग लिमिटेड, दिनदयाल नगर, हुसेनपूर, पोस्ट-चितेपिंपळगाव, तालुका आणि जिल्हा - औरंगाबाद, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मोलॅसिसवर आधारित ४५.० किलोलिटर प्रति दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्प कार्यरत साखर उद्योगात उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स छत्रपती संभाजीराजे साखर उद्योग लिमिटेड, दिनदयाल नगर, हुसेनपूर, पोस्ट-चितेपिंपळगाव, तालुका आणि जिल्हा - औरंगाबाद, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मोलॅसिसवर आधारित ४५.० किलोलिटर प्रति दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्प कार्यरत साखर उद्योगात उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक, ३० सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार, दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-७१ /२०२१,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०९०३एफटीएस-०००९ दिनांक ०३/०९/२०२१ सप्टेंबर, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली व मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी पत्र क्र. ८९४ दि. २७/०९/२०२१ अन्वये अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना प्राधिकृत केले आहे.

जाहीर लोकसुनावणीस खालील सदस्य उपस्थित होते.

१) डॉ. अ. बा. गव्हाणे,
अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद
जिल्हा औरंगाबाद - **अध्यक्ष**

२) डॉ. प्रविण जोशी,
प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद

३) श्री. प्र. द. वानखेडे
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद. - समन्वयक

श्री प्रदिप वानखेडे, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद-१, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री डॉ. अनंत गव्हाणे, अपर जिल्हादंडाधिकारी, औरंगाबाद तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. प्रवीण जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त १०० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणी बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने

मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री प्रदिप वानखेडे यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मे. छत्रपती संभाजीराजे साखर उद्योग लिमिटेड, दिनदयाल नगर, हुसेनपूर, पोस्ट-चितेपिंपळगाव, तालुका आणि जिल्हा - औरंगाबाद, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मोलॅसिसवर आधारित ४५.० किलोलिटर प्रति दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज दिनांक २०-०८-२०२१ रोजी प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग लाल मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील राज्य पर्यावरण तज्ज्ञ समितीस (SEIAA) प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण

आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दि. ०४/०६/२०२१ रोजी सादर केला व त्यास अर्जास महाराष्ट्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक ११-०८-२०२१ रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया या इंग्रजी वर्तमानपत्रात दि. ३०-०८-२०२१ रोजी जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-औरंगाबाद, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - औरंगाबाद, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, औरंगाबाद, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद, तहसीलदार, तहसील कार्यालय - औरंगाबाद, जिल्हा - औरंगाबाद, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय- टाकळीमाळी, पिंपळगाव चिते, गारखेडा, सांजखेडा,पिंपरी राजा, कादराबाद, पिंपळगाव पांढरी या सात संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका आणि जिल्हा - औरंगाबाद, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - औरंगाबाद, उप प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद, व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर

सामान्य जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद- १, म.प्र.नि.मंडळ औरंगाबाद यांना एकूण पाच सूचना/तक्रार/आक्षेप प्राप्त झालेले असून त्यातील चार ईमेलव्दारे तर एक लेखी तक्रार श्री गणेश स्वरुपचंद्र ब्रम्हनाथ, राहणार-हुसेनपुर, पोस्ट-चितेपिंपळगाव, तालुका व जिल्हा-औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेली असून संबंधित सर्व सूचना/आक्षेप/तक्रारी कारखान्यास पील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेल्या आहेत.

आयोजक,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. सदरहू सूचना/आक्षेप यांची इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डीग जशीच्या तशी चित्रफित पर्यावरण, वने व जलवायू मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण भांडवली गुंतवणूक रुपये 1,365/- लाख आहे. तर कारखान्यासाठी आवर्ती खर्च रुपये 237.04 लाख एवढा प्रती वर्षी आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आलेः-

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

१) **श्री प्रकाश चांगुलपाय, राहणार-पिंप्रिराजा, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

या प्रकल्पामुळे आजूबाजूच्या गावांवर काही विपरीत परिणाम होईल काय? आजूबाजूच्या लोकांच्या आरोग्यावर काही परिणाम होऊ शकतो काय याबाबत मार्गदर्शन करावे.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुनच प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर प्रकल्पात करण्यात येणार आहे. सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडला जाणार नाही. त्यामुळे परिसरात पाण्याचे प्रदूषण होणार नाही.

त्याचप्रमाणे बॉयलरमध्ये उत्पन्न होणारी राख ही वीटभट्टीधारकांना वीटा बनविण्याठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

या नवीन तंत्रज्ञानामुळे आपण जो कचरा/वेस्ट समजतो, त्याचाही पुनर्वापर करुन कारखान्यास पैसे मिळणार आहेत. टाकाऊ मधून टिकाऊ असाच हा उपक्रम मोठ्या प्रमाणात असल्याने त्यास सुरवातीस प्रकल्प प्रवर्तकांना काही पैसे खर्च करावे लागतील. त्यामुळे त्याचे भविष्यात उत्पन्न मिळणार असून पर्यावरणाचेही संरक्षण होणार आहे. प्रकल्पात उत्पादनप्रक्रियेत जे प्रदूषण होईल, ते बाहेर जाणार नाही.

२) **श्री गणेश स्वरुपचंद ब्रम्हणात, राहणार-हुसेनपुर, पोस्ट-चितेपिंपळगाव, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

या जनसुनावणीसाठी उपस्थितांमध्ये हुसेनपुर गावाचे लोक आहेत, पण ७५% हे कर्मचारी बसलेले आहेत. त्यांनी मागणी केली की आमच्या हुसेनपुर गावाच्या लोकांना वेगळे व कारखान्याचे कर्मचारी यांना वेगळे करण्यात यावे. यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही जनसुनावणी आहे. जनसुनावणीच्या ३० दिवस आगाऊ वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रकाशित करण्यात आलेली आहे. त्यामुळे अजूनही कोणी बाहेर असल्यास त्यांना बोलता येईल. कामासाठी कर्मचारी नेमले जातात. आपणास आपले मत, सूचना वा आक्षेप नोंदविण्यास कोणीही अडथळा आणणार नाही. आपण

उपस्थित केलेल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात येत आहे. त्यामुळे आपण आपले मत, सूचना निर्भयपणे मांडाव्यात.

श्री ब्रम्हणात यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की ईआयए अहवालात असा उल्लेख आहे की प्रकल्पाजवळील हुसेनपुर येथील पाच विहिरीच्या पाण्याचे नमुने घेण्यात आले. तर माझ्या विहिरीच्या पाण्याचा नमुना का घेण्यात आलेला नाही? त्यावेळी सद्स्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी हुसेनपुर येथील पाच विहिरींच्या पाण्याचे नमुने घेतले त्याची नावे व अहवाल सांगण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सर्वेषण करण्यात आलेल्या सर्व स्थानांचे (Places) म्हणजे भूगर्भीय (ground water), भूपृष्ठीय, माती, ध्वनी आणि हवा याबाबतची माहिती वाचून दाखविली. त्यावेळी सद्स्य पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी अगदी साधा प्रश्न विचारलेला आहे तर त्यांच्या विहिरीचा पिण्याच्या पाण्याचा नमुना घेतलेला नाही असा त्यांचा आक्षेप आहे. तरी तो नमुना परत घेण्यात यावा अशी सूचना केली.

यावेळी **श्री प्रतापसिंग महासिंग घुणावत, राहणार-हुसेनपूर** यांनी असे मत मांडले की आसवणी प्रकल्प हा प्रस्तावित आहे. मात्र अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्यामुळे जे दुष्परिणाम झालेले आहेत, त्याबाबत आम्ही बोलतोय. यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ज्यांना कोणाला आपल्या विहिरींच्या पाण्याचे नमुने तपासायचे आहेत, त्यांनी लेखी अर्ज दिल्यास त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सूचना केली की संबंधित व्यक्तीचे नांव घेऊन शास्त्रीय पध्दतीने विहिरीच्या पाण्याचा नमुना संकलीत करुन अहवाल उपलब्ध करुन देण्यात यावा.

**श्री गणेश स्वरुपचंद ब्रम्हणात** यांनी दुसरा प्रश्न विचारला की कारखान्यातील राख ही मोकळ्या जागेत टाकली जाते. राख टाकताना व ती ट्रॅक्टवर परत भरताना ती वा-याने उडून जनावरांच्या चा-यावर जाते. त्यामुळे जनावरे चारा खात नाही. ती राख उडून मोसंबी फळावर पडते परिणामी मोसंबीच्या फळावर त्याचा परिणाम झाल्याने व्यापारी अत्यंत कमी किंमतीत मोसंबी फळ घेतात. त्याचा नमुना मी आणलेला आहे. त्यांनी मोसंबी हे फळ पर्यावरण सल्लागार समितीस दाखविले.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले की ही जनसुनावणी नवीन प्रकल्पाविषयी आहे. त्यामुळे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सादर केलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सूचना, शंका वा आक्षेप

नोंदविणे आवश्यक आहे. येथे कारखाना व्यवस्थापनास सूचना करण्यात येते की कार्यरत प्रकल्पामुळे परिसरातील शेतक-यांना काही उपद्रव होत असेल, पीकांवर काही परिणाम होत असेल, येथे मोसंबी काळी पडल्याचे दिसत आहे, राख उडत असेल, आजूबाजूच्या रहिवाशांच्या कार्यरत प्रकल्पाविषयी तक्रारी असतील, तर त्यांनी त्याबाबत त्वरित उपाययोजना अंमलात आणाव्यात. आपणास आसवणी प्रकल्पाबद्दल काही सूचना असल्यास त्या उपस्थित कराव्यात.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्पन्न होणा-या राखेबाबत पुढील नियोजनाबाबत माहिती विचारली. पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पश्चिम महाराष्ट्रात राखेच्या वीटा करण्याबाबत प्रयोग करण्यात आला. राख आणि बाईडिंग साहित्य वापरुन बांधकामात त्याचा वापर करता येतो. राखेच्या वीटांचे वजन आणि सद्यस्थितीत वापरात असलेली वीट, टिकाऊपणा याबाबत अभ्यास केल्यानंतर राखेच्या वीटातही क्षमता आहे हे सिध्द झालेले आहे. त्याचा वापर सुरु झालेला आहे. लोकांची मागणी वाढली आहे.

प्रकल्पाचे अध्यक्ष यांनी सांगितले की गेले २० वर्षे हा कारखाना चालू आहे. प्रकल्पातील कामगार हे शेजारच्या गावातील आहेत. आतापर्यंत राखेबाबत एकही तक्रार आमच्या कारख़ान्यास प्राप्त झालेली नाही. राख आणि प्रदूषणाबाबत एकही तक्रार कारखान्यास प्राप्त झालेली नाही. गेले दोन वर्षे प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा कार्यान्वित आहे. बाहेर धुरसुध्दा जात नाही. बॉयलर स्वच्छ करताना काही वेळेस दहा मिनिटांसाठी काही वेळेस दिसतो. राख ट्रॅक्टरवाले गोळा करुन लगेचच भट्टयावाल्यांना देतात. या कारखान्यानेही दुस-याचे नुकसान केले नाही. आसवणी प्रकल्प कार्यन्वित करताना प्रदूषण नियंत्रण मंडळ ज्या ज्या सूचना करतील, त्या अंमलात आणण्यात येतील.

**श्री गणेश स्वरुपचंद ब्रम्हणात** यांनी पुढील प्रश्न विचारला की कारखान्यातून निघणारे सांडपाण्यासाठी कारखान्याच्या पूर्वेला तीन खड्डे खणण्यात आलेले आहे. कारखान्यातील पाणी त्याच्यात सोडले जाते. आसवणी प्रकल्पात ३३.० घनमीटर सांडपाणी निर्माण होणार आहे. तर त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येणार? याचे तर फार दुष्परिणाम होणार आहेत.

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री गणेश स्वरुपचंद ब्रम्हणात यांनी यांना त्यांचे सर्व आक्षेप नोंदविण्याची सूचना केली. नंतर पर्यावरण सल्लागार यांना एकत्रित उत्तर देण्यास सांगितले.

श्री गणेश स्वरुपचंद ब्रम्हणात यांनी मुद्दा मांडला की प्रस्तावित आसवणी प्रकल्पास ९९५.० घनमीटर एवढे पाणी लागणार आहे. हे पाणी सुखना धरणातून उपसा केलेले जाणार आहे. सुखना धरणातून पाणी उपसा केले तर आमच्या गावातून पाट गेलेला आहे. पाणी उपसा केल्यास आमच्या शेतक-यांना कमी पाणी मिळेल.

तरी या प्रस्तावित प्रकल्पामुळे आमच्या गावाचे नुकसान होणार आहे. म्हणून संपूर्ण गावाचा या प्रकल्पाला विरोध आहे. हा प्रकल्पा चालू झाल्यास दुष्परिणाम होणार आहे. जर दुष्परिणाम झाले, तर मी जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मदहन करणार आहे.

३) <u>श्री प्रतापसिंग महासिंग घुणावत, हूसेनपूर,पोस्ट-चित्तेपिंपळगाव, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-</u>

छत्रपती संभाजीराजे साखर उद्योग लिमिटेड हा कारखाना २००१ मध्ये माझ्या परिसरात उभारण्यात आला. त्यावेळी आम्हांला वाटत होते की त्याचा परिसरात विकासासाठी फायदा होईल. मात्र आम्हाला कोणताही लाभ नाही, फक्त दुष्परिणाम आहेत. आसवणी प्रकल्प तर भविष्यात होणार आहे. त्यामुळे आमच्या गावाने ठरविले आहे की या प्रकल्पास विरोध करायचा. येथे इतर उद्योग सुरु होणार आहेत. त्यास आमचा विरोध नाही. पण ह्या हुसेनपूर गावात स्थानिक भाषेत म्हणतात दारुचा उद्योग हा आमच्या गावात होऊ नये.

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की प्रथम गावात ग्रामसभा घेऊन नंतरच ना हरकत प्रमाणपत्र प्रकल्प प्रवर्तकांना अदा करणे आवश्यक होते. मात्र तसे झाले नाही. त्याचप्रमाणे परिसरातील इतर गावातही ग्रामसभा घेऊन नंतरच प्रकल्प प्रवर्तकांना ना हरकत प्रमाणपत्र अदा करणे आवश्यक होते. तसे न होता ना हरकत प्रमाणपत्र अदा करण्यात आले.

माझ्या हुसेनपुर गावातील सर्व ग्रामसभा सदस्यांचे सहीचे पत्र आपणास सादर करण्यात आलेले आहे. कार्यरत प्रकल्पात येणा-या जाणा-यांना किती त्रास होतो, याची दखल घेतलेली नाही.

सांजखेडा ते हुसेनपूर आणि हुसेनपुर ते कचनेर करमाड हा रस्ता झालेला आहे. ह्या दोन गावांना रस्ता हा लागून आहे. तेथे जलप्रदूषण नियंत्रण सयंत्र रस्त्याच्या बाजूला बसलेले आहे. प्रकल्प चालू असताना त्यातून पाण्याचा फवारा उडत असतो व रस्त्यातून जाताना माणूस संपूर्ण घाण पाण्याने भिजून जातो. त्याचप्रमाणे उत्पन्न् होणारा भूसा हा

डोळ्यात जातो व त्यामुळे मोटर सायकल चालविता येत नाही. हे आताचे प्रश्न आहेत. आसवणी सुरु झाल्यानंतर आम्हांला गावच सोडून द्यावे लागते काय असे वाटते. त्याचप्रमाणे हा प्रकल्प जर एमआयडीसीत उभा करावा, आमच्या शेतात व बांधावर नको. जरी कारखान्यामुळे रोजगार मिळाला, तर हुसेननगरमधील फक्त दोन कामगार कायमस्वरुपी आहेत. आमच्यावर आस्मानी संकट पावसाच्या रुपात आलेले आहे. त्यामुळे आमची उभी पीके गेली. आता सुलतानी संकट आसवणीच्या रुपात आलेले आहे. जर आमचे म्हणणे ऐकले नाही, तर काही शेतक-यांना आत्महत्येशिवाय इतर पर्याय राहणार नाही. ही सर्व गावक-यांकडून कळकळीची विनंती. येथील गावक-यांचा या प्रकल्पाला विरोध आहे. तरी आपण सहकार्य करावे.

प्रकल्पाचे अध्यक्ष यांनी सांगितले की स्प्रे पॉण्डचे पाणी उडत असेल तर आम्ही निश्चितच पाहू. आतापर्यंत आमच्याकडे याबाबत कोणीही तक्रार केलेली नाही. यावर उपाययोजना म्हणुन उंच झाडे लावुन योग्य ती उपाययोजना करु. त्याचप्रमाणे हंगामी कामगारांना काम देण्यासाठीच आसवणी प्रकल्पाचे नियोजन केलेले आहे. इथेनॉल पेट्रोल ब्लेंडीगसाठी लागणार आहे. देशाला लागणा-या ८५% पेट्रोलची आयात होते. पेट्रोल ब्लेंडिंगमुळे परकीय चलनात बदल होईल. इथेनॉलपासून गॅस निर्माण होणार आहे, भविष्यात त्यावर वाहने चालतील, तीही तरतुद करण्यात आलेली आहे. तरी प्रकल्पास पाठिंबा द्यावा अशी विनंती केली.

**४) <u>श्री राजाराम किसन ब्रम्हणात, हूसेनपूर,पोस्ट-चितेपिंपळगाव, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-</u>**

मी येथील शेतात गेले २० वर्षे आहे. हुसेनपूरहून मी एकटाच २० वर्षे या शेतात येतो. माझे पाणी खराब झाले, मला कारखाना दहा हजार रुपये देत होता. मी घेतले नाही. आता तीन वर्षांनी माझे पाणी खराब झाले. तरी माझ्या शेताचे, पाण्याचे काहीही नुकसान होऊ नये.

प्रकल्पाचे अध्यक्ष यांनी सांगितले की सुखना धरणात पाणी नव्हते. तेव्हा शहरातून पाणी आणून कारखाना चालू केलेला आहे. २०१२-१३ पासून पावसाचे पाणी गोळा करुन कारखाना चालवत आहे. ऊसातील पाणी काढून परत शेततळे भरत ठेवत आहे. धरणातून पाणी आम्ही २०१३ पासून घेत नाही. आमचे लाईट बील बघा. श्री ब्रम्हनाथ यांच्या शेजारीच आमच्या विहिरी आहेत. जर आमच्या विहिरीचे पाणी चांगले असून ते आम्ही वापरतो,

मग शेजारील श्री ब्रम्हनाथ यांची विहिर कशी खराब होईल? आम्ही याबाबत वेळोवेळी तपासणी केलेली आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ देखील साखर कारखाना चालू असताना वेळोवेळी तपासणी करत असते.

त्याचप्रमाणे नवीन कारखान्यात दारू तयार होईल असे सांगण्यात येते. तर कारखान्यात दारू तयार होणार नाही. ऊसाच्या रसापासून इथेनॉल, मळीपासून इथेनॉल होईल. तयार इथेनॉल हे पेट्रोलियम कंपन्यांना पेट्रोल ब्लेडिंगसाठी पाठविण्यात येईल.

५) **<u>सौ. रेखा पुनमसिंग ब्रम्हणात, राहणार-हुसेनपुर, पोस्ट-चितेपिंपळगाव, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-</u>**

मी हुसेनपुरची शेतकरी आहे. २००० साली माझे लग्न झाले व तेव्हापासून मी कारखान्याचे प्रदूषण बघत आहे. गावातील सर्वांचे असे म्हणणे आहे की आसवणी प्रकल्प गावात नको. गावात राजपुत समाज आहे. त्यांना मराठी बोलताच येत नाही. म्हणून दोनच लोक बोलले असे आमदारसाहेबांना वाटले, पण तसे नाही. प्रकल्पास विरोध करणारे बरेच लोक बाहेर उभे आहेत. साखर कारखान्याचे दुष्परिणाम आम्ही भोगत असून आसवणीमुळे अजून त्रास नको. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी संबंधित महिला व्यक्तीस दुष्परिणाम काय होतील असे आपणास वाटते ते सांगावे. महिला व्यक्तीनी सांगितले की साखर कारखान्याच्या सांडपाण्यामुळे जी दुरावस्था झालेली आहे, ती आम्ही भोगत आहोत. वासाचे त्रास व दूषित पाणी जमिनीत झिरपत आहे. आमदारसाहेब म्हणतात, मला कोणी विरोध केला नाही. गरीब लोक आमदारसाहेबांना काय विरोध करणार? साखर कारखाना सुरु करताना असे आश्वासन देण्यात आले की हुसेनपूर गावातील प्रत्येक घरातील एक व्यक्तीस कारखान्यात काम देण्यात येईल. जेमतेम ४-५ व्यक्ती असून ते कायमस्वरुपी कामगार नाहीत. तेही ७-८ हजार पगारावर काम करत आहेत. आमचे सांगणे आहे की आसवणी प्रकल्प माझ्या गावात नको.

६) **<u>श्री आदिनाथ मोरे, सरपंच पांढरेपिंपळगाव, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-</u>**

ह्या प्रकल्पापासून काही घातक/हानीकारक कचरा निर्माण होईल काय?

या प्रकल्पात कोणतेही घातक रसायने वापरली जात नाही व उत्पादन प्रक्रियेतूनही कोणतेही घातक पदार्थ उत्पन्न होत नाही. सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे प्रकल्पातील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर कारखान्यातच करणार आहोत, तर राख ही वीटनिर्मितीसाठी

वापरणार आहोत, तर स्लज जे आहे, ते खत निर्मितीसाठी वापरणार आहोत. त्यामुळे प्रकल्पातून कोणताही घातक पदार्थ प्रकल्पाबाहेर पडणार नाही.

७) **श्री रविंद्र उत्तमराव गवळी, राहणार- टाकळीमाळी, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

आसवणी प्रकल्पात सांडपाणी किती निर्माण होईल व त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

प्रक्रियेत ३७६ केएलपीडी उत्पन्न् होणारे सांडपाणी सीपीयु (कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट) मध्ये प्रक्रिया करुन त्याचे स्वच्छ पाण्यात रुपांतर होणार आहे. त्या शुध्द पाण्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे.

८) **श्री गणेश कचरु गवळी, राहणार- सांजखेडा, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

आसवणी प्रकल्प किती दिवस चालणार आहे? आसवणी प्रकल्प मान्यतेसाठी ज्या ग्रामपंचायतींना परवानगी मागितली, त्या ग्रामपंचायतीतील क्षेत्रातील युवकांना रोजगारात संधि देण्यात यावी.

आसवणी प्रकल्प हा २७० दिवस चालेल. म्हणजे ९-१० महिने चालू शकतो. त्यामुळे निश्चितच रोजगारात वाढ होणार आहे. आता आपण ६५ व्यक्तींना रोजगार मिळणार असे म्हटले आहे. ते ६५ म्हणजे फक्त तांत्रिक कर्मचारी असतील. मात्र, अप्रत्यक्ष रोजगारात/व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल. प्रकल्पात Online Continuous Monitoring System कार्यरत आहे. त्याचे एक कनेक्शन मुंबईत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरला व एक केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरला जोडावेच लागते. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा ही कार्यक्षमतेने कार्यान्वित ठेवावीच लागते.

९) **श्री लालचंद देवचंद ब्रम्हणात, राहणार-हुसेनपुर, पोस्ट-चितेपिंपळगाव, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

कारखान्याचे सांडपाणी गटारात जाते, त्यामुळे गटारातील सर्व पाणी आमच्या वावरात येते. आमचे नुकसान होत आहे. हा कारखाना चालू झाला, तेव्हा मी पाणी उपलब्ध करुन दिले. मात्र माझे पाणी कारखान्याकडून बंद करण्यात आलेले आहे.

१०)**श्री गजानन नारायण गवळी, सांजखेडा, तालुका आणि जिल्हा-औरंगाबाद**

येथून ४ कि.मी. अंबिकापूर शिवार शेती आहे. पलिकडे ४.० कि.मी. प्रेस मडवर प्रक्रिया करणारा रॅडिकोचा प्लॅंट आहे. तो कार्यान्वित असल्यास फारच दुर्गंधी येते. तर हा आसवणी प्रकल्प दुर्गंधी न येण्यासाठी काय उपाययोजना राबवविणार आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की द्रवरुप स्वरुपाचा कच-यावर आपण उत्पादनात पुनर्वापर करणार आहोत. हे नवीन तंत्रज्ञानामुळे शक्य झालेले आहे. त्यासाठीच सुमारे ३० कोटींची गुंतवणूक करणार आहोत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की उपस्थितांना खूपच चांगल्या सूचना केल्या. प्रश्नकर्त्याचे नाव, गाव व प्रश्नाचा मसुदा पुर्णपणे नमुद करण्यात आलेला आहे. बैठकीत दोन प्रकारचे विषय आले. जनसुनावणी ही प्रस्तावित आसवणी प्रकल्पाबाबत होती. जनसुनावणीत अनेकांनी नवीन प्रकल्पाविषयी सुचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. विकासाची कामे आणि पर्यावरण हाच मुख्य उद्देश अशा जनसुनावणी बैठकींचा असतो. अशी समिती स्थापन केल्यानंतर त्यावर शासनाची समिती असते, ती सर्व विधिग्राह्यता लक्षात घेऊनच प्रकल्पांना मंजूरी देत असते. बैठकीत पाण्याबाबत शंका विचारण्यात आली. लोकांची शंका ही रास्त आहे. मात्र पाण्याबाबत प्रत्येक संवर्गाबाबत शासनाने धोरण जाहिर केलेले आहे उदा-पिण्याचे पाणी शेतीसाठीचे पाणी, उद्योगांसाठीचे पाणी इत्यादी. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. त्या सर्वांची नोंद व लाईव्ह व्हिडिओग्राफी घेण्यात आलेली आहे. तरी प्रशासनातर्फे आभार मानण्यात आले.

सुनावणी दरम्यान अध्यक्षांच्या सूचनेनुसार कोणाचे लेखी निवेदन/आक्षेप/तक्रार/सूचना असल्यास सादर करण्यातबाबत विनंतीस अनुसरुन ०१ निवेदन सुनावणी दरम्यान हुसेनपुर गावक-यांनी प्रस्तावीत प्रकल्पाकरिता प्रकल्पाने टाकळीमाळी, एकलहेरा, महमंदपुर, हुसेनपूर व मलकापुर, ता. जि. औरंगाबाद या ग्रामपंचायतींचे ना हरकत प्रमाणपत्र त्या गावातील लोकांना विश्वासात न घेता सादर केले असल्याचे नमुद केले असुन प्रस्तावीत आसवणी प्रकल्पास परवानगी देउ नये अशी विनंती केली आहे.

सुनावणीपुर्वी या कार्यालयास एकुण ०४ सुचना अनुक्रमे दि. २६/०९/२०२१, २७/०९/२०२१ व २९/०९/२०२१ श्री. एच मधुबाबू हैद्राबाद, व्ही सुनंदा रेडी, तेलंगणा, श्री. रंगा रेडी, तेलंगणा व श्री. चेतापल्ली व्यंकन्ना तेलगंणा यांच्या मार्फत ई-मेल दवारे प्राप्त झालेली असुन त्यामध्ये प्रकल्प उभारताना काही सूचना केलेल्या आहेत. तसेच या कार्यालयास एक लेखी तक्रार श्री. गणेश ब्रम्हणात

यांच्यामार्फत दि. २२/०९/२०२१ रोजी प्राप्त झालेली आहे. या सर्व सुचना व तक्रारी प्रकल्प धारकास या कार्यालयाने योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविलेल्या आहेत.

डॉ. राजेश औटी, क्षेत्र अधिकारी यांनी जनसुनावणी समितीचे व उपस्थित असलेल्या ग्रामस्थांचे तसेच कारखाना प्रतिनिधी व कारखाना व्यवस्थापनाचे मंडळाच्या वतीने आभार मानले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदरील पर्यावरण विषय जनसुनावणीचे कामकाज संपन्न झाल्याचे घोषीत केले.

**(प्रदिप वानखेडे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद

**(डॉ. प्रवीण म. जोशी)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ,
औरंगाबाद

**(डॉ. अनंत गव्हाणे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अप्पर जिल्हाधिकारी,औरंगाबाद,
जिल्हा-औरंगाबाद